# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२३

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### सन २०१९-२०२० ची संचमान्यता स्थगित करणेबाबत

**(१) ३३१० (०२-०६-२०२०) श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन आदेश परिपत्रक दिनांक १५/०१/२०२० नुसार संचमान्यता स्थगिती उठविण्यात आली असून कोरोना आणीबाणीच्या काळात सन २०१९-२०२० च्या संचमान्यतेमुळे अनेक शिक्षक अतिरिक्त होतील हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिरिक्त होणाऱ्या सर्व शिक्षकांचे समायोजन होणे कठिण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०१९-२०२० ची संचमान्यता स्थगित करून सर्व शिक्षकांना व संस्था चालकांना विद्यार्थी संख्या वाढविण्याकरिता आणखी एक संधी उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०६-०९-२०२३) :** (१), (२) व (३) सन २०१९-२० ची संचमान्यता स्थगित केल्यामुळे ज्या शाळेत विद्यार्थी संख्या वाढलेली आहे अशा शाळांमध्ये संचमान्यतेत पदे उपलब्ध होणार नाही व शिक्षकांच्या समायोजनाची बाब प्रलंबित राहील त्यामुळे शासन पत्र दिनांक १५ जानेवारी, २०२० अन्वये सन २०१९-२० च्या संच मान्यतेस दिलेली स्थगिती उठविण्यात आली आहे. तद्नंतर शासन पत्र दिनांक २१/०४/२०२० अन्वये सन २०१९-२० च्या संचमान्यतेकरिता सरल पोर्टलवरील दिनांक ३१/०१/२०२० या दिनांकाची विद्यार्थी संख्या विचारात घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### केळवद (जि.नागपूर) येथे सुगंधीत तंबाखूची तस्करी होत असल्याबाबत

**(२) १०५४१ (०६-०१-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळवद (जि.नागपूर) येथे सुगंधीत तंबाखूची तस्करी करणाऱ्या आरोपींना जामिनावर सोडल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून अन्न औषध प्रशासन विभागामार्फत याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा अवैध धंदे करणाऱ्यांवर विभागामार्फत कुठल्याही प्रकारची कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुगंधीत तंबाखूची तस्करी रोखण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम (२४-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनाकडून प्रतिबंधित अन्न पदार्थांची वाहतूक, विक्री, साठवणूक करणाऱ्या तत्वांविरूध्द वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.
(३) केळवद पोलीस स्टेशन, ता.सावनेर, जि.नागपूर यांचेकडुन माहिती प्राप्त होताच दिनांक ०३/०८/२०२१ व दिनांक २७/०८/२०२१ रोजी प्रतिबंधित अन्न पदार्थांचे अवैध धंदे करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनामार्फत कारवाया करण्यात आल्या. दिनांक ०३/०८/२०२१ रोजी केलेल्या कारवाईत केळवद पोलीस स्टेशन, ता.सावनेर, जि.नागपूर येथे रुपये ५४,०००/- किंमतीचा अन्न पदार्थंचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणातील आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम १८८, २७२, २७३ व ३२८ अंतर्गत पोलीस स्टेशन केळवद येथे प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आलेला आहे.

तसेच, दिनांक २७/०८/२०२१ रोजी केलेल्या कारवाईत केळवद पोलीस स्टेशन येथे रुपये ४,५५,७७६/- किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणातील आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम १८८, २७२, २७३ व ३२८ अंतर्गत पोलीस स्टेशन केळवद येथे प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आलेला आहे.

या दोन्ही प्रकरणी मा.प्रथम श्रेणी न्यायालय, सावनेर येथे खटले दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड व दौंड (जि.पुणे) पुनर्वसनासाठी राखीव शेरे कमी करण्याबाबत

**(३) १२०२७ (३०-०३-२०२२) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील १७ तसेच दौंड (जि.पुणे) तालुक्यातील १२ गावांमधील पुनर्वसनासाठी राखीव शेरे कमी करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर प्रस्तावास शासनाने अनुमती दिली आहे काय, तसेच याची अंमलबजावणी कधीपर्यंत होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील (२१-०९-२०२३) :** (१), (२) व (३) भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील खेड व दौंड तालुक्यातील अनुक्रमे १७ व १२ गावांसह अन्य तालुक्यातील गावांतील ७/१२ च्या इतर हक्कातील पुर्नवसनाचे राखीव शेरे कमी करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे दिनांक ३०/०१/२०२२ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, पुणे यांचेमार्फत शासनास सादर केलेला आहे.

उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने काही प्रकरणी शेरे उठविण्यास शासन मान्यता देण्यात आलेली असून उर्वरित प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

दरम्यान महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२२ अन्वये राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील जमिनीवर, पुनर्वसनाचे राखीव शेरे इतर हक्कात नमूद करुन जमिनीच्या हस्तांतरणावर लादलेले निर्बंध शिथिल करुन सदर जमिनीचे शेती वापरासाठी हस्तांतरण अनुज्ञेय केलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विजयदुर्ग (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) किल्ल्याच्या संवर्धनाबाबत

**(४) १२१०७ (३०-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विजयदुर्ग (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) किल्ल्याच्या संवर्धनासाठी तालुक्यातील १७ ग्रामपंचायतीच्या ठरावासह विजयदुर्ग ग्रामविकास मंडळ, रामेश्वर आणि गिर्ये गावाच्या वतीने दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास एक सविस्तर निवेदन प्रांताधिकारी, कणकवली यांना सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) विजयदुर्ग किल्ल्याच्या संवर्धनासाठीची मागील २ वर्षापासून सातत्याची मागणी असतानाही शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२५-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) विजयदुर्ग किल्ला हा केंद्र शासनाच्या अखत्यारीतील केंद्र संरक्षित स्मारक आहे. या किल्ल्याच्या संवर्धनासाठीचा रुपये ६५.५३ कोटी इतक्या रकमेचा सर्वकष विकास आराखडा महानिदेशक, भारतीय पुरातत्व विभाग, नवी दिल्ली यांना दिनांक १२/०५/२०२३ रोजी मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर शहरातील सिटी चौक ते नौबत दरवाजा रस्त्यांच्या कामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) १२९०३ (३०-०३-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील सिटी चौक ते नौबत दरवाजा रस्त्यांचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील नऊ मीटर रुंद रस्त्यांकरिता शासनाने रुपये १५० कोटींचा निधी मंजूर केला असून नऊ मीटर रुंद असलेल्या रस्त्यावरील अतिक्रमण हटविल्यानंतर रस्त्याची रुंदी अठरा मीटर रुंद होऊन रस्त्यांची रुंदी दुप्पट झाल्याने रस्त्याच्या कामाकरिता अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रस्त्यांच्या कामाकरिता अतिरिक्त निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०८-२०२३) :** (१) छत्रपती संभाजीनगर शहरातील सिटी चौक ते नौबत दरवाजा या रस्त्याच्या कामाकरिता नाल्यावरील पुलासह ९ मीटर रस्त्याकरिता रु ३,३२,३,८७७ /- इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(२) व (३) सिटी चौक ते नौबत दरवाजा कामांतर्गत उर्वरित कामाकरिता दिनांक ०२/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २,९९,६९,६७४/- निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## रायगडच्या समुद्रात जेलिफिशमुळे नुकसान झालेल्या स्थानिक मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(६) १३७८५ (३०-०६-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड (ता.अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन) जिल्ह्यातील समुद्रात जेलिफिशने थैमान घातले असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, जेलिफिशमुळे मत्स्य उत्पादन कमी झाल्यामुळे मासेमारीचा व्यवसाय बंद झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एलईडी बोटींच्या प्रकाश झोताने जेलिफिश खोल समुद्रात जात नसून किनाऱ्याकडे येत असल्याने जेलिफिशचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जेलिफिशमुळे नुकसान झालेल्या स्थानिक मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच शासनाकडून एलईडी बोटी बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (११-०८-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

वातावरणीय बदलामुळे खोल पाण्यातील जेलिफिश किनाऱ्याच्या जवळ येत असल्याने मच्छिमारांना त्रास होतो. तथापि, हे ठराविक कालावधीत होत असल्याने ज्या किनारी भागामध्ये जेलिफिशचा प्रादुर्भाव होत असतो, त्याठिकाणी त्या कालावधीपुरता लहान मच्छिमारांना (हाताने मासेमारी करणे) मत्स्यव्यवसाय बंद ठेवावा लागतो.
(३) एलईडी बोटीच्या प्रकाश झोताने जेलिफिश खोल समुद्रात जात नसून किनाऱ्याकडे येत असल्याबाबत मत्स्यव्यवसाय संशोधन संस्थाकडून अभ्यास होणे आवश्यक आहे. तसेच जेली फिशच्या काही प्रजाती समुद्राच्या तळाशी राहतात तर इतर प्रजाती पृष्ठभागाच्या जवळ असतात. समुद्रातील उच्च तापमान प्रजनन साठी अनुकूल तसेच समुद्रात आवश्यक पोषक खाद्याची मुबलकता असल्याने भारताच्या किनारपट्टीवर दक्षिण-पश्चिम मान्सूनची सुरूवात झाल्यानंतर जवळजवळ प्रत्येक वर्षी मुंबई किनारपट्टीवर जेली फिशचे झुंडी आढळून येत असतात.
(४) जेलफिशच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानीबाबत नुकसान भरपाई देण्याची कोणतीही योजना सद्य:स्थितीत कार्यान्वित नाही. एल.ई.डी मासेमारीस आळा घालण्यासाठी शासन अधिसूचना दिनांक २७/०४/२०१८ अन्वये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात एलईडी मासेमारीस प्रतिबंध करण्यात आले आहे. एल ई.डी अनधिकृत मासेमारी नौका निदर्शनास आल्यास अशा अनधिकृत नौकावर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) २०२१ अन्वये जास्तीत जास्त शास्ती लादण्याची तरतूद असून त्याप्रमाणे अनधिकृत नौकांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी वाळूज (छत्रपती संभाजीनगर) परिसरात शेतकऱ्यांकडून अल्पदरात जमिनी खरेदी केल्याबाबत

**(७) १४०८४ (०४-०७-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी वाळूज (छत्रपती संभाजीनगर) परिसरात मोठ्या प्रमाणात जमीन खरेदी केल्याची बाब माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी भूखंडाचे मावेजा लक्षात घेऊन नातेवाईकांच्या नावावर जमिनी खरेदी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसी च्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून अत्यंत कमी भावात जमिनी खरेदी करुन शेतकऱ्यांची पिळवणूक केली असून संबंधित प्रकरणी दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

**श्री.उदय सामंत (२८-०७-२०२३) :** (१), (२) व (३) अतिरिक्त वाळुंज औद्योगिक वसाहतीसाठी गंगापूर तालुक्यातील मौजे आरापूर, गवळीशिवर, सुलतानाबाद या गावातील सुमारे ९५० हे.आर जमीन संपादीत करण्याच्या पुर्वीच सरकारी मावेजा लाटण्याच्या हेतुने एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी जमिनी खरेदी केल्याबाबतची बातमी दिनांक १७/५/२०२२ व दिनांक १९/५/२०२२ रोजीच्या दैनिक पुढारी वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांनी जमिनी खरेदी केलेबाबत कोणतीही अधिकार अभिलेख उपलब्ध नाहीत, असे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौ.वरवडे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करणेबाबत

**(८) १६७६० (२८-१२-२०२२) श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील वरवडे प्राथमिक आरोग्य केंद्र ते परबवाडी गवळदेवपर्यंतचा १ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम सन २००२ मध्ये ग्रामस्थांचे श्रमदान व रोजगार हमी योजनेंतर्गत तत्कालीन मा.खासदार निधीतून पूर्ण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची आतापर्यंत एकदाही दुरुस्ती, खडीकरण, डांबरीकरण न करणे, रस्त्यात येणाऱ्या मोऱ्या व साईडपट्ट्याचे काम न करणे, सदरचा रस्ता शेतकऱ्यांच्या शेतातून जाणे इत्यादी कारणात्सव दरवर्षी शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती, संरक्षक भिंत, नुतनीकरण दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा नियोजन विभागाकडे सादर करण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये, जिल्हा वार्षिक योजना प्रारुप आराखडा सन २०२२-२३ तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ मध्ये मंजुरी देण्यात आल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कणकवली तालुक्यातील मौ.वरवडे (जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (२५-०७-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २००१ पूर्वी वरवडे ग्रामस्थांनी श्रमदानातुन रस्ता तयार केला असून सन २००१-०२ मध्ये खासदारांच्या निधीमधुन डांबरीकरण करण्यात आले आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे. अस्तित्वातील १ कि.मी. रस्त्यामधील जवळपास २१०.०० मी. इतक्या लांबीचे डांबरीकरण करुन नुतनीकरण करण्यात आले आहे तसेच शेत जमिनीच्या भागातुन जाणाऱ्या रस्त्यांच्या भरावाचे पावसाळयात माती कोसळुन नुकसान होते, ही बाब खरी आहे.

(३) जिल्हा वार्षिक योजना २०२२-२३ करिता सदर रस्त्याचे काम प्रस्तावीत करण्यात आले होते. तसेच, कार्यकारी अभियंता, ग्रामीण रस्ते विकास संस्था, सिंधुदुर्ग यांना देखील सदर कामे हाती घेण्याबाबत जिल्हापरिषदेने प्रस्तावीत केले आहे.

(४) कामकाजाचे अंदाजपत्रक तयार करुन प्रशासकीय मंजुरी मिळणे बाकी आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## मौजे कोहोज खुंटवली, (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील जागेचा वापर अधिकृत करुन महसूल दप्तरी नोंद होणेबाबत

**(९) १६८१० (२९-१२-२०२२) श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोहोज खुंटवली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील न.पु.क्र. ५८५७ या शासकीय जागेवरील २०० चौ.मी. जागेचा वापर अधिकृत करुन महसूल दप्तरी नोंद होणेबाबत श्रीमती सत्यभामा तुकाराम लोटे यांनी जिल्हाधिकारी, ठाणे, उप लोक आयुक्त, ठाणे, तहसिलदार, अंबरनाथ व मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, जि.ठाणे यांचेकडे सन २००४ पासून ते सन २०२२ पर्यंत अनेकवेळा लेखी पत्राद्वारे मागणी/निवेदन/तक्रारी द्वारे मागणी केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोक आयुक्त, ठाणे यांच्याकडे दिनांक २८ मार्च, २०२२ रोजी अर्जदाराने केलेला अर्ज मंडळ अधिकारी अंबरनाथ यांचेकडे चौकशीकामी पाठविण्यात आला असून त्यानुसार मंडळ अधिकारी यांनी अर्जदार यांचे रहिवाशी अतिक्रमण हे अंबरनाथ नगरपरिषद यांचे हददीत अंतर्भूत असून त्यांच्याकडील पत्र क्र.१) अनप/नरवि/२०१७-१८/२३५७ दिनांक २२/०२/२०१८ २) जा.क्र. अनप/नरवि/२०२०- २४/२०४६ दिनांक १९/०२/२०२१ अन्वये मंजूर विकास आराखड्याचा प्रस्ताव दर्शविण्यात आलेला आहे, त्याप्रमाणे विषयाकित भूखंडाचे क्षेत्र हे रहिवास परिमंडळात अंतर्भूत होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच न.भु.क्र. ५८५७ या मिळकत पत्रिकेनुसार सदर भूखंडाचे एकूण क्षेत्र १०५११.२० चौ.मी. असून महाराष्ट्र सरकार अशी नोंद आहे, सत्ता प्रकार “ग” शासकीय जमीन सुचीमध्ये अंतर्भूत आहे, तरी मंजूर आराखड्याशी सुसंगत व नगरपरिषदेच्या अहवाला आधारे नियमानुकूल करणेबाबत जाहीरनामा क्रमांक एम गुल/८२-८३/०३०४ दिनांक ४ नोव्हेंबर, १९८२ नुसार महाराष्ट्र झोपडी सुधारणा (दुरुस्ती पुनर्वसन व पुनविकास) अधिनियम १९०२ अन्वये झोपडपट्टी अधिसूचित झालेली आहे किंवा कसे याबाबत प्रचलित नियमानुसार पडताळणी करण्याबाबत अर्जदाराने अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांचेकडे दिनांक १९

सप्टेंबर, २०१९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये केलेल्या अर्जात अर्जदाराच्या घराचा अधिसूचित झोपडपट्टी भागात समावेश होतो किंवा कसे याबाबत निर्णय घेता येत नसल्याचे अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अर्जदार हा अनुसूचित जमाती या मागास प्रवर्गातील असून न.पु.क्र. ५८५७ या शासकीय जागेवरील २०० चौ.मी. जागेचा वापर अधिकृत करुन महसूल दप्तरी नोंद होणेकरिता न्यायाच्या प्रतिक्षेत आहे, याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी अर्जदारास न्याय मिळवून देण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) अंबरनाथ नगरपरिषदेकडून दिनांक १२/०१/२०१८ रोजी देण्यात आलेल्या झोन दाखल्यानुसार सदरचा भुखंड रहिवास क्षेत्रात आहे.

(३) अंबरनाथ शहराच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे मौजे कोहोज खुंटवली येथील न.भु.क्र.५८५७ या जागेचा काही भाग रहिवास विभागात समाविष्ट असून त्यावरील जागेसाठी झोपडपट्टी अधिसूचित झाली नसल्याचे अंबरनाथ नगरपरिषदेने जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविले आहे.

अर्जदाराच्या घराचा अधिसूचित झोपडपट्टी भागात समावेश होतो किंवा कसे याबाबत कागदपत्रांच्या अभावी निर्णय घेता येत नसल्याचे नगरपरिषदेने माहिती अधिकार अर्जाच्या उत्तरामध्ये अर्जदारास कळविले आहे.

(४) व (५) दिनांक १७/११/२०१८ व दिनांक ०६/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्वांसाठी घरे-२०२० या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात असलेल्या सर्व शासकीय विभागांच्या (वन विभाग वगळून) जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत स्वयंस्पष्ट तरतूदी नमूद आहेत.

उक्त शासन निर्णय दिनांक ०६/०३/२०१९ मधील अट क्र.४ मध्ये ज्या अतिक्रमण धारकाने या योजनेचा लाभ घेण्याच्या दृष्टीने नियमानुकूल करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. परंतु अशा अतिक्रमण धारकाचे अतिक्रमित क्षेत्र १५०० चौ.फुट पेक्षा जास्त आहे, अशा अतिक्रमण धारकाने १५०० चौ.फुट पेक्षा जास्त असलेले अतिक्रमण स्वत: निष्कासित केल्याशिवाय अशा अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्यात येवू नये असे नमूद आहे. त्यानुसार अर्जदार यांचे अतिक्रमण क्षेत्र १५०० चौ.फुट पेक्षा जास्त असल्याने याप्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६, एकत्रित विकास नियंत्रण नियमावली (UDCPR) तसेच उक्त नमूद शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेऊन याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांनी मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद यांना दिले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बेस्ट वसाहतीतील कर्मचाऱ्यांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत

**(१०) १६९६० (२५-०३-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट वसाहतीतील कर्मचाऱ्यांना मालकी हक्काची घरे देण्याची मागणी बेस्ट कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेस्ट वसाहतीतील कर्मचाऱ्यांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) व (२) बेस्ट उपक्रमाच्या आस्थापनेवर असलेल्या २८,९०१ अधिकारी / कर्मचारी वर्गासाठी बेस्ट उपक्रमाकडे फक्त ५४७० सदनिका आहेत. यास्तव अनेक कर्मचारी सदनिका मिळण्याच्या प्रतिक्षा यादीवर आहेत.

मुंबई शहरामध्ये अखंडीत विद्युत पुरवठा व वाहतूक सेवा पुरविण्यासाठी कामगारांप्रती एक कल्याण सुविधा म्हणून त्यांच्या कामाच्या ठिकाणाजवळ राहण्याची व्यवस्था करणे आवश्यक ठरते. बेस्ट उपक्रमामधून सेवानिवृत्त किंवा सेवासमाप्ती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या जागी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सदनिका प्रदान करणे आवश्यक ठरते.

तसेच शासकीय निवासस्थान हे शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या सेवकवर्ग सदस्यांसाठीच लागू असल्याने सदर सदनिका सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नावे करणे व्यवहार्य होणार नाही असा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी अपील क्रमांक ६६१९/२०१४ मध्ये दिनांक ०५ ऑगस्ट, २०२१ रोजी दिला आहे.

बेस्ट उपक्रमातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर त्यांना देय असलेले आर्थिक लाभ उपक्रमाकडून देण्यात येत असल्याने सदर सेवानिवृत्त कर्मचारी त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर उपक्रमाकडून प्राप्त झालेल्या आर्थिक लाभांमधून स्वत:च्या मालकीचे निवासस्थान खरेदी करु शकतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानेगांव (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथील खाजगी मालकीच्या जमिनीवर महसूल विभागाने केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(११) १७०८० (२५-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेगांव (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथील खाजगी मालकीच्या पडित जमिनीवर महसूल विभागाने अवैध वृक्षतोड करणे, शेतात हजारो ब्रास मातीचे उत्खनन करणे तसेच विटांच्या कारखान्यांपासून नागरिकांना प्रदूषणाचा त्रास होणे, शेतीवर अतिक्रमण करणे, अवैध कनेक्शनद्वारे शेतीला पाणीपुरवठा करणे, इ.गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी अखिल भारतीय लोकतंत्र संघ, जि.बुलढाणा यांनी दिनांक १२

एप्रिल, २०२२ व दिनांक ११ मे, २०२२ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विटांच्या कारखान्यांपासून स्थानिक नागरिकांना होणाऱ्या प्रदूषणाच्या त्रासाबाबत नागपूर हायकोर्टामार्फत चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महसूल विभागामार्फत गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०८-२०२३) :** (१) जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय लोकतंत्र संघ यांचे निवेदन दिनांक २३/११/२०२१, ०४/०३/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना प्राप्त झाले. सदर निवेदनानुसार तहसिलदार, जळगांव जामोद यांनी विटभट्टी धारकांवर दंडात्मक कार्यवाही करून अवैध विटभट्ट्या निष्काषीत करण्याबाबत प्रदूषण महामंडळ, अकोला यांना कळविले आहे.
(२), (३) व (४) मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशानुसार चौकशी समिती नेमण्यात आली. सदर समितीने सन २०२१-२२ मध्ये जळगांव जा. तालुक्यात ३९ विटभट्टी धारकांवर दंडात्मक कारवाई करून रुपये २३,१७,५२०/- दंड करण्यात आलेला आहे.

---

## सांताक्रुझ (मुंबई) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जागेचा बेकायदेशीर व्यावसायिक वापर करणाऱ्या हॉटेल व्यवस्थापनावर कारवाई करण्याबाबत

**(१२) १७१५० (२५-०३-२०२३) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांताक्रुझ (मुंबई) येथील हॉटेल ग्रॅण्ड हयात या हॉटेल व्यवस्थापनाने हॉटेल भूखंडाशेजारील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या सीटीएस क्र.३४५४ हा ३०३६.२७ चौ.मी. मैदानावर हॉटेलच्या दोन कुलींग टॉवर ची उभारणी करुन तसेच हॉटेलच्या अन्य समारंभाकरिता सदर जागा भाड्याने देऊन जागेचा बेकायदेशीर वापर सुरु ठेवल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक वर्षापासून हॉटेल ग्रॅण्ड हयात हॉटेलच्या व्यवस्थापनाकडून सदर भूखंडाचा बेकायदेशीररित्या वापर होत असून त्याविरोधात आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे वारंवार तक्रारी करण्यात येऊनही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून संबंधित हॉटेल व्यवस्थापन विरोधात कोणतीच कायदेशीर कारवाई करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ३० ते ३५ हजार चौ.फू. जागेचा बेकायदेशीर व्यावसायिक वापर केल्याप्रकरणी संबंधित हॉटेल व्यवस्थापनावर दंडात्मक कारवाई करून सदरहू जागेचा गैरवापर करणाऱ्यांकडे

जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०९-२०२३) :** (१), (२) व (३) सांताक्रुझ, मुंबई येथील सीटीएस क्रमांक ३४५४अ/२ धारण करणारा ३०३६.२७ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा सुविधा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक १३/१२/२०२१ रोजी प्राप्त झाला आहे. सदर सुविधा भूखंडापैकी १०% मनोरंजन मैदान या सुविधेसाठी राखीव आहे. सदर राखीव असलेल्या मनोरंजन मैदानाचा ताबा घेतेवेळी त्यावर कुलिंग टॉवर्स अस्तित्वात नव्हते.

तसेच, हॉटेल ग्रॅण्ड हयात व्यवस्थापनाने त्यांच्या मालकीच्या भूखंडावर दोन्ही कुलिंग टॉवर्सचे बांधकाम केले असून, त्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने परवानगी दिली आहे. हॉटेल ग्रॅण्ड हयात व्यवस्थापनामार्फत त्यांच्या मालकीच्या भूखंडावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

सदर भूखंडावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालये स्वच्छ ठेवण्याबाबत

**(१३) १७२६५ (२५-०३-२०२३) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालये दिवसातून पाच वेळा स्वच्छ केली जातील अशी घोषणा बृहन्मुंबई महानगरपालिकेने केली असून सदर घोषणेला तीन आठवडे होऊनही शौचालय चालकांना यासंदर्भात सूचना किंवा प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाच वेळा शौचालय साफ करण्याच्या कोणत्याही लेखी सूचना किंवा नोटीसा मिळाले नसल्याचे "पे ॲण्ड युज" शौचालय चालविणाऱ्यांनी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहरातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालये स्वच्छ ठेवण्याबाबतची मागणी मुंबईतील नागरिकांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील सार्वजनिक शौचालयांची नियमितपणे स्वच्छता राखून मुंबईतील नागरिकांना सुसज्ज असे सार्वजनिक शौचालये उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) व (२) मुंबईतील सार्वजनिक व सामुदायिक शौचालये दिवसातून पाचवेळा स्वच्छता/निर्जंतुकीकरण करण्याबाबतचे परिपत्रक दिनांक २९/१२/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने पारित केले असून, त्याअनुषंगाने सर्व संस्थांना याबाबतची सूचना / नोटीस रवाना केली आहे.

माहे जानेवारी, २०२३ पासून सदर कामास विभाग स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) अशी कोणतीही मागणी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची नियमित स्वच्छता / निर्जंतुकीकरण केले जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धाराशिव नगरपरिषदेअंतर्गत कंत्राटदारांना दिलेले धनादेश न वटता परत आल्याप्रकरणाची संबंधितांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) १७३११ (२५-०३-२०२३) श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक १५१८८ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव नगरपरिषदेतील मुख्याधिकाऱ्यांनी त्यांच्या कालावधीत केलेल्या विकास कामांची बिले अदा करण्यासाठी दिलेले धनादेश निधी नसल्याने न वटता परत आलेले असून असे एकूण किती रकमेचे किती धनादेश परत आलेले आहेत, याबाबत संपूर्ण तपशिलाचा खाते उतारा देण्यासाठी दिनांक २२ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, धाराशिव यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील माहिती विधिमंडळाच्या कामकाजासाठी आवश्यक असल्याचे पत्रात नमूद करुन माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी वारंवार सूचना व पत्र देऊनही तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकूण ६ वेळा पत्रव्यवहार व वारंवार पाठपुरावा केल्यानंतर दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजी पोस्टाद्वारे मिळालेली माहिती अपूर्ण, चुकीची, दिशाभूल व भ्रमित करणारी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अर्धवट, खोटी व दिशाभुल करणारी माहिती देणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी धाराशिव नगरपरिषदेच्या बॅंक खात्यांसंदर्भातील माहिती दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधी यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी नियुक्त केलेल्या द्वितीय चौकशी समितीच्या अहवालानुसार, विविध १६ बॅंकेत १३६ बॅंक खाती असल्याचे आढळून आले आहे. त्यानुषंगाने तत्कालीन मुख्याधिकारी यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना चुकीची माहिती दिल्यामुळे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी तत्कालीन मुख्याधिकारी, तत्कालीन लेखापाल, तत्कालीन लेखापरिक्षक यांच्याविरुध्द दिनांक ०५ मार्च, २०२३ रोजी पोलीस स्टेशन आनंदनगर, धाराशिव यांच्याविरुध्द गुन्हा दाख़ल केला आहे.

आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २३ मार्च, २०२३ पासून, तत्कालीन लेखापाल व तत्कालीन लेखापरिक्षक यांना निलंबित केले आहे. तसेच तत्कालीन मुख्याधिकारी यांना निलंबित करुन त्याच्याविरुध्द जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी दिनांक ०८/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजा कारंजा (जि.वर्धा) येथील औद्योगिक क्षेत्रातील गटांकरिता म. औ. विकास अधिनियम १९६१ अन्वये शुध्दीपत्र निर्गमित करण्याबाबत

**(१५) १७५०० (२५-०३-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा कारंजा (जि.वर्धा) येथील अति. कारंजा आद्योगिक क्षेत्रातील अधिसुचित केलेल्या क्षेत्रामध्ये काही गटात तसेच क्षेत्रात संयुक्त मोजणीनुसार वाढ/ घट होत असल्याने सदर म. औ. विकास अधिनियम १९६१ अन्वये शुध्दीपत्र निर्गमित करण्याबाबत उद्योग ऊर्जा विभागाद्वारे दिनांक ०७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.जिल्हाधिकारी, वर्धा यांना लेखी पत्र देण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शुद्धीपत्रक काढण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२८-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी शासनाने दिनांक ३०/११/२०२२ रोजी शुद्धीपत्रक निर्गमित केले.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील निवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी निवृत्तीनंतरच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(१६) १८०९२ (२५-०३-२०२३) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील ५९ माध्यमिक अनुदानित शाळांतील निवृत्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार निवृत्ती वेतन आणि ग्रॅच्युटी इ. उपदान अदा करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन व इतर देय लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात वरिष्ठ महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) १९२१४ (०४-०८-२०२३) श्री.जयंत आसगावकर, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे : तारांकित प्रश्न क्रमांक १७१४० ला दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठ, कॉलेज यांची गुणवत्ता वाढ व जागतीक शिक्षण स्पर्धेत टिकून राहण्यासाठी व महाविद्यालयांना नॅक मूल्यांकनामध्ये चांगला दर्जा प्राप्त व्हावा, तसेच मुलांना मिळणारे शिक्षण उच्च दर्जाचे असावे यासाठी शासनाचे प्रयत्न आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॉलेजांमधील शैक्षणिक दर्जा व अभ्यासक्रमाची गुणवत्ता राखण्यासाठी नॅक मुल्यांकन न केलेल्या किंवा त्याची प्रक्रिया सुरू न केलेल्या अनुदानित आणि खाजगी कॉलेजांची संलग्नता काढून घेण्यात यावी असे निर्देश राज्याच्या उच्च शिक्षण विभागाच्या संचालकांनी दिले असून मुल्यांकन न करणाऱ्या व मुल्यांकन टाळणाऱ्या महाविद्यालयांच्या अडचणींमध्ये भर पडून प्रवेश प्रक्रिया रखडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६ च्या विद्यापीठ कायद्यानुसार नॅक मुल्यांकन करून घेणे ही विद्यापिठांची प्राथमिक जबाबदारी असतानाही ३३४६ महाविद्यालयांपैकी १३८० महाविद्यालयांनीच नॅक मुल्यांकन करून घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बहुतांशी महाविद्यालयांमध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,उक्त प्रकणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या महाविद्यालयांमधील पूर्ण वेळ शिक्षकांच्या किती जागा रिक्त आहेत, तसेच सदर रिक्त जागा भरणेबाबत तसेच नॅक मुल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांची रखडलेली प्रवेश प्रक्रिया सुरळीत होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१८-०९-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ कलम १०९(६) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकना बाबत तरतूद आहे. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांनी सदर अटी व शर्तींचे अनुपालन करण्याबाबत वेळोवेळी सूचना संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून देण्यात आल्या आहेत. राज्यातील ३३४६ पैकी १९५२ महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे संचालक, उच्च शिक्षण यांनी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण आणि संबंधित महाविद्यालये/ संस्थाचे प्राचार्य यांना महाविद्यालयाचे नॅक करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना वेळोवेळी दिल्या आहेत. याशिवाय ज्या महाविद्यालयांनी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रारंभ दिनांकापर्यंत नॅक मुल्यांनाबाबतची प्रक्रीया सुरु केलेली नाही अशा महाविद्यालयाविरुध्द

अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन त्याचा अहवाल सादर करण्याबाबत दिनांक २३/०५/२०२३ च्या पत्रान्वये सर्व विद्यापीठांना कळविले आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) शासन निर्णय दिनांक ०३/११/२०१८ अन्वये राज्यात अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ४० टक्के पदे (३५८० पदे) भरण्यास मान्यता देण्यात आली होती. यापदांपैकी रिक्त असलेल्या २०८८ पदांची भरती करण्यास शासन निर्णय दिनांक १२/११/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, नॅक मुल्यांकन करुन घेण्यासाठी पात्र असलेल्या महाविद्यालयांना शासनाकडून वेळोवेळी सूचना देऊनही नॅक मुल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांवर अधिनियमातील तरतूदीनुसार विद्यापीठांकडून कारवाई होणे अभिप्रेत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तलाठी पदभरतीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी आकारण्यात आलेले अवाजवी परीक्षा शुल्क कमी करण्याबाबत

**(१८) २०७०७ (०८-०८-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागांतर्गत नुकतीच तब्बल ४६४४ तलाठी (गट क) पदभरतीसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रुपये १००० परीक्षा शुल्क आकारण्यात आले असल्याची बाब दिनांक २६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात करोनाच्या महामारीनंतर सर्वसामान्य जनतेची आर्थिक परिस्थिती स्थिर झाली नसल्याने तलाठी पदाच्या भरतीप्रक्रियेत खुल्या प्रवर्गासाठी आकारण्यात आलेले प्रवेश परीक्षा शुल्क राज्यातील बेरोजगारांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि तलाठी पदभरतीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी आकारण्यात आलेले अवाजवी परीक्षा शुल्क कमी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०८-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२), (३) व (४) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १४/०२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये,भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरताना स्पर्धा परीक्षा टी.सी.एस.-आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) व आय.बी.पी.एस. (इंस्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनल सिलेक्शन) या कंपन्यांमार्फत ऑनलाईन पध्दतीने घेताना कंपन्यांना द्यावयाची रक्कम, कर व प्रशासकीय खर्च मिळून प्रति उमेदवार रुपये १०००/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यात यावे व या परीक्षा

शुल्कात राखीव प्रवर्गासाठी १० टक्के सवलत देण्यात यावी, असे नमूद केले आहे. यानुसार तलाठी पदभरती-२०२३ करिता परीक्षा शुल्क निश्चित केलेले आहे.

---

## दुसऱ्या महायुद्धातील लाभार्थ्यांना वाढीव मानधन मिळण्याबाबत

**(१९) २०८५८ (०९-०८-२०२३) श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुसऱ्या महायुद्धातील लाभार्थ्यांना दरमहा ९००० इतके अर्थसहाय मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २२ ऑगस्ट, २०१९ पासून शासनाकडे सादर करण्यात आला असून, इतर राज्याप्रमाणे राज्यात देखील सदर मानधनात वाढ करण्याची मागणी कित्येक वर्षापासून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वातंत्र्यसैनिक हे वयोवृध्द झाल्याने व वाढत्या महागाईचा विचार करता त्यांनी मागणी केलेल्या मानधनात वाढ करण्याबाबत सन २०१९ पासून आजपावेतो कोणत्याही प्रकारचा निर्णय वा कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुसऱ्या महायुध्दातील लाभार्थ्यांच्या मानधनात वाढ करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०९-२०२३) :** (१) होय, दिनांक २२, ऑगस्ट, २०१९ रोजीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

(२) सदर प्रस्ताव प्राप्त होण्यापूर्वी दिनांक १८/०९/२०१८ च्या शासन निर्णयान्वये दुसऱ्या महायुद्धात भाग घेतलेल्या माजी सैनिकांना/त्यांच्या विधवांना दरमहा देण्यात येणाऱ्या प्रत्येकी रुपये ३०००/- इतक्या अर्थसहाय्यात दुपटीने वाढ करून ते दरमहा रुपये ६०००/- करण्यात आले आहे.

सदर प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या कालावधीत राज्यात निवडणूक आचार संहिता सुरू होती.

तद्नंतर कोविड-१९ प्रादुर्भावामुळे राज्यात अतिरिक्त वाढीव खर्चावर निर्बंध असल्याने तत्कालीन परिस्थितीत सदर प्रस्ताव मान्य करण्यात आला नाही.

(३) सैनिक कल्याण विभाग,पुणे यांचेकडून तपशिलवार प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांच्या मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देणेबाबत

**(२०) २८८८७ (१३-०४-२०१७) श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सन २००७ मध्ये १४८ कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २६ जून, २००७ च्या शासन निर्णयानुसार या कनिष्ठ महाविद्यालयांना सन २०१२ ते २०१५ पर्यंतच्या कालावधीत टप्याटप्याने शिक्षक व शिक्षकेतर अनुदान देणेबाबत कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने समितीच्या अहवालाप्रमाणे प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१८-०७-२०२३) :** (१), (२) व (३) होय.

राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शासन निर्णय दिनांक २६/०६/२००८ नुसार मंजूर असलेल्या शिक्षकांच्या पदांवर नियुक्त केलेल्या व शासन नियमानुसार मान्यता मिळालेल्या उच्च माध्यमिक शिक्षकांना दरमहा वेतन अदा करण्यात येत आहे.

तसेच विजाभज उच्च माध्यमिक आश्रमशाळा चालविण्याऱ्या संस्थांनी मा.न्यायालयात दाखल केलेल्या विविध याचिकांवर मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार विभागाने कार्यवाही करुन प्रथमत: १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांपैकी निकषपात्र ९४ उच्च माध्यमिक आश्रमशाळांना वित्त विभागाच्या सहमतीने दिनांक २१/०१/२०१३ व दिनांक २४/०१/२०१३ रोजीच्या आदेशानुसार देय ठरणारे वेतनेतर अनुदान दिनांक ०८/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आले आहे. तसेच उर्वरित ४७ उच्च माध्यमिक आश्रमशाळांपैकी आवश्यकनिकष पूर्ण केलेल्या ४४ आश्रमशाळांना वेतनेतर अनुदान लागू करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव वित्त विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.